**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.177, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# दादा कोंडके यांच्या मराठी चित्रपट गीतांमधून होणारे लोकशिक्षण

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Abstract**

*माणसाला मनोरंजनासाठी प्रबोधनासाठी आपले विचार, भावना, कल्पना, सुख दुःख इतरांपुढे मांडण्यासाठी गाणी गायनाची व गाणे ऐकण्याची आवड पूर्वीपासूनच दिसून येते. विविध सण समारंभ, विधी, चालीरीती, रूढी, परंपरा याप्रसंगी म्हटली जाणारी व मौखिक परंपरेतून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेली गाणी यामधूनही आपले मनोरंजन व प्रबोधन होत आलेले आहे. पूर्वीच्या काळातील जात्यावरच्या ओव्या, शेतीमध्ये विविध कामे करताना गायली जाणारी व ऐकली जाणारी विविध लोकगीते यामधूनही करमणूक आणि लोकशिक्षणही होत होते. अधिक शब्द, लांब वाक्य, मोठ मोठाले परिच्छेद उतारे यांचा वापर करण्यापेक्षा कमीत कमी अचूक मोजक्या शब्दांचा वापर करून संदेश देवाणघेवाणीची प्रक्रिया करणे माणसाला अधिक आवडते. अभंग, भारूड, गवळण, ओवी याद्वारे संतांनीही लोकरंजनातून लोकप्रबोधन केलेले आहे. शाहिरांनी आपल्या शाहिरी रचनाद्वारे समाज प्रबोधन केले आहे. मानवी मनाला असणारी गाण्याची आवड लक्षात घेऊन चित्रपटांमध्येही चित्रपटाचे कथानक, पात्र, प्रसंग, स्थळ, काळ, चित्रपटाचा हेतू या घटकांचा विचार होऊन गरजेनुसार गीतांचा समावेश केलेला असतो.*

***की वर्ड:*** *दादा कोंडके, चित्रपट गीत, लोकशिक्षण*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

आपल्या चित्रपटांमधून अस्सल, गावरान, रांगडा, ग्रामीण मराठी बाज मांडून जनसामान्यांच्या मनावर राज्य करणारे प्रचंड लोकप्रियता लाभलेले मराठी मातीतील अष्टपैलू कलाकार म्हणजे दादा कोंडके. दादासाहेब खंडेराव कोंडके यांचा जन्म 1928 मध्ये कृष्णाष्टमीला मुंबई येथे झाला. त्यांचे मूळ गाव भोर तालुक्यातील इंगवली. दादांचे वडील मिलमध्ये नोकरीला असल्यामुळे त्यांचे कुटुंबीय मुंबईमध्येच वास्तव्यास होते. या मुलाला पुढे काही भविष्य नाही हा किरकोळ सर्वसामान्य मुलगा आहे असं भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांचे भाकीत दादांच्या जिद्द, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर खोटे ठरले. सुरुवातीच्या काळात दुकानात काम करण्यापासून चाळीत भजनी मंडळ चालविणे, बँड पथकात विविध वाद्ये वाजविणे यांसारखी कामेही दादांनी केली. कोणत्याही कामाला त्यांनी कमी दर्जाचे लेखले नाही. विच्छा माझी पुरी करा या वसंत सबनीस लिखित लोकनाट्यातील अभिनयामुळे दादा यशाच्या शिखरावर

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पोहोचले. संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर त्यांनी या लोकनाट्याचे दीड हजाराच्यावर प्रयोग केले. राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकातही त्यांनी मनापासून आपली कला सादर करून समाज प्रबोधन केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही दादांनी आपल्या कलेद्वारे योगदान दिले. विच्छा माझी पुरी करा या लोकनाट्याच्या प्रत्येक प्रयोगात दादा तत्कालीन राजकीय व सामाजिक जीवनावर आपल्या विनोदी शैलीने प्रकाश टाकायचे. त्यासाठी ते नियमिततपणे रोजच्या वर्तमानपत्रांचे बारकाईने वाचन करायचे. नेमक्या मार्मिक शब्दातून हजरजबाबीपणामुळे दादा प्रेक्षकांच्या टाळ्या घ्यायचे. त्यांना मनमुराद हसवायचे. मोठमोठे साहित्यिक, कलाकार, नट राजकारणी, त्यांच्या विच्छाच्या प्रयोगाला हजर असायचे.

विच्छाच्या अफाट लोकप्रियतेनंतर भालजी पेंढारकरांमुळे दादांना मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर मात्र दादा स्वतः निर्माता, दिग्दर्शक, गीतकार, वितरक असे बहुगुणी बहुरंगी बहुढंगी व्यक्तिमत्व असणारे कलाकार म्हणून शहरी व ग्रामीण भागातील तळागाळातील जनमाणसात ओळखले जाऊ लागले, बहुजन समाजात दिसणारा वावरणारा साधा भोळा भाबडा सामान्य माणूस दादांनी आपल्या चित्रपटांमधून नायक म्हणून समाजापुढे आणला. सर्वसामान्यांच्या रोजच्या जीवनात वापरली जाणारी सरळ साधी सोपी सुटसुटीत, सामान्यांना सहज समजेल अशी भाषा दादांनी स्वतःच्या चित्रपटांमध्ये मांडली. म्हणूनच आजही दादा व दादांचे चित्रपट, चित्रपटातील गीते सर्वसामान्य मराठी माणसाच्या थेट हृदयात शिरून मनावर अधिराज्य गाजवतात. आजही सर्वसामान्य मराठी माणूस दादांचे चित्रपट आवडीने पाहतो व चित्रपटातील गीतांचाही मनमुराद आनंद लुटतो. दादा मराठी माती, मराठी माणूस व मराठी संस्कृती यांच्याशी इतके एकरूप झाले की, प्रेक्षक व दादा यांच्यात कसलाच आडपडदा शिल्लक राहिला नाही. म्हणूनच आजही दादांचे चित्रपट, चित्रपटातील गीते सदाबहार अवीट ठरतात.

सलग नऊ चित्रपट सिल्वर जुबली करून गिनिज बुकात नोंद होऊनही आपल्याकडील उच्चभ्रू पांढरपेशा समाजानेमात्र दादांची उपेक्षा केली. सभ्यतेचा बुरखा पांघरलेल्या पांढरपेशा समाजाने दादांच्या चित्रपटांना, गीतांना द्विअर्थी अश्लील म्हणून हिणवलं. प्रत्येक चित्रपट, गीते प्रदर्शित करताना दादांना प्रचंड संघर्ष करावा लागला. सेन्सॉर बोर्ड, उच्चभ्रू पांढरपेशा समाज यांचा मनस्ताप सहन करूनही दादांचा प्रत्येक चित्रपट लोकप्रिय ठरला. दादांच्या चित्रपटांमधून, गीतांमधून मनोरंजनाबरोबर समाज प्रबोधन लोकशिक्षणही झालेले आहे व ते आजही अविरतपणे होतच आहे. होतच राहील.

**2) कार्यात्मक व्याख्या**

**दादा कोंडके**

1928 ते 1998 या कालखंडातील मराठी चित्रपट सृष्टीमधील प्रसिद्ध अभिनेते.

**चित्रपट गीत**

चित्रपटाचे शीर्षक, चित्रपटाचा आशय, चित्रपटातील नायक, नायिका, अन्य पात्र व प्रसंग स्थळ, काळ, वेळ या बाबींचा विचार करून गायनाद्वारे विशिष्ट आशय प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती असणारी, खटकेबाज, नादमाधुर्य, संगीतमय शब्दरचना.

**लोकशिक्षण**

ग्रामीण व शहरी भागातील समाजाच्या तळागाळातील सामान्य महिला-पुरुष, शेतकरी शेतमजूर, कामगार, मुले-मुली यांना नैतिक मूल्यांद्वारे सद्विचारी, सदाचारी मूल्याधिष्ठित बनविणारे शिक्षण.

**दादांच्या चित्रपट गीतांमधून लोकशिक्षण होणारी काही चित्रपटांमधील निवडक गीते**

एकटा जीव सदाशिव या चित्रपटातील गेली सांगून ज्ञानेसरी न् माणसा परास मेंढर बरी या गाण्यामध्ये दादा म्हणतात लबाड ढोंगी स्वार्थी माणसांपेक्षा मेंढरे प्रमाणिक आहेत. मालक मेंढरांना चारा घालतो त्या बदल्यात मेंढरं आपल्या मालकाला जीव लावतात, त्याला माया, प्रेम देतात. या गीतातून दादांचे मुक्या प्राण्यांवरचे प्रेम दिसून येते. तसेच आपण सर्वांनी मुक्या प्राण्यांवर प्रेम केले पाहिजे असा संदेश त्यांनी या गीताद्वारे दिलेला आहे.

पांडू हवलदार या चित्रपटातील बाई ग केळेवाली मी सांगा तुम्हाला सोबल का या गीतातील

तुझा न् माझा हा जमलाय जोडा
पगार माझा हा लय ग थोडा
तेवढ्यात भागल का

अशी शब्दरचना करून पोलिसांना मिळणारे कमी पगार या समस्येला वाचा फोडली आहे.

तुमच आमचं जमलं या चित्रपटातील अंजनीच्या सुता हे भजन मराठी प्रेक्षकांना भक्तिरसात चिंब भिजवते.

धन्य तुझी राम भक्ती धन्य तुझी सेवा
तुझे भक्त आम्ही सारे उपाशी का देवा?

सर्वसामान्यांच्या वतीने या गीतातून दादा देवाला प्रश्न विचारतात. याच चित्रपटातील माझं माझं म्हणीत होतो मलाच त्यांनी सोडलं हे गीत तर प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रू उभे करते. रक्ताची नाती माणसाला

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पोरकं करतात मात्र एक वाघ्या नावाचा श्वान शेवटपर्यंत दादांना साथ देतो. दादा या गीतात खऱ्याची साथ न सोडण्याचा संदेश देतात. खोटं बोलून पोट भरण्यात काहीच अर्थ नाही असंही ते सांगतात.

नाही मिळालं पोटाला तरी धन्यासाठी तु मरतुया

माणूस मातर पैशासाठी खून आईचा करतोया

आजही समाजात दिसणारे जळजळीत वास्तव दादा मांडतात. कुणाचं मन दुखवू नये, एखाद्याला लावलेली माया तोडू नये अशी शिकवण दादा या गीतांमधून देतात. नैतिक मूल्यांची पेरणी करणारे हे गीत अतिशय भावस्पर्शी आहे.

आली अंगावर या चित्रपटातील वेळ आली बाका तिथं देव करी काय हो या गीतात दादा म्हणतात

कशी या दुनियेची रीत उफराटी संकट लागतया सत्याच्या पाठी
हरामी खात्यात तूप अन् रोटी गरिबाच्या माथ्यावर शेणाची पाटी
निवडून गेल्यावरती नेता जो तो पैसा खाय हो

वरील शब्दरचनेद्वारे दादांनी समाजात दिसणारी गरीब-श्रीमंत ही विषमता, भांडवलदारांकडून सामान्यांची होणारी पिळवणूक, काळाबाजार, भ्रष्टाचार, माणसाची स्वार्थी प्रवृत्ती याकडे आपले लक्ष वेधले आहे. याच गीतात दादा पुढे म्हणतात

शिकून  लोकं झाली सुधारणा भारी
बापाला नेत्यात कोर्टाच्या दारी

शिक्षण घेऊन माणूस खरंच सुधारतो का? असा प्रश्न दादा समाजाला विचारतात. शिक्षण घेतल्यामुळे माणसात प्रेम, सहानुभूती, संयम, नैतिकता, बंधुभाव, दया यांसारखे सद्गुण निर्माण व्हायला हवेत, मात्र उच्च शिक्षण माणसाला स्वार्थी, संकुचित, आत्मकेंद्री बनविते याबाबत दादा आपणास चिंतन करायला लावतात. समाजात वाढणारी वृद्धाश्रमांची संख्या, संपत्तीच्या वादावरून वर्षानुवर्ष कोर्टात चालणारे खटले यांसारख्या सामाजिक समस्यांवर या गीतामधून प्रकाश टाकलेला आहे.

मुका घ्या मुका या चित्रपटातील तुमच्या संग मला येऊद्याकिरं या गीतात दादा म्हणतात

हे हाय का तुम्हाला ठावं
गोरगरिबाला संगती न्यावं
जो ठेवतोया दुजाभावं
त्याला कसा हो पावणारा देवं

वरील गीतात दादांचा सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा विचार दिसून येतो. समाजात भेदभाव असू नये, गरिबांनाही प्रगतीच्या संधी मिळायला हव्यात हा सामाजिक समतेचा संदेश दादा या गीताद्वारे मांडतात. या चित्रपटातील नाव तुझे घेण्यासाठी सांगू किती लोका लोका या गीतात दादा म्हणतात

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तूच चालविशी विश्व कसा तुझा न्याय
श्रीमंत पालखीत गरिबाला नाही पाय
पूजाऱ्यांची मोठी पोटं
भक्त संकटी राही भूका
खरं बोलता बोलता जितेपणी गेला तुका
ज्यांच्यासाठी केलं सारं तेच घालती रे लाथा
येतो तुझ्या भेटीसाठी पूरं झालं जगणं आता

देवधर्माच्या नावावर गरीब, अज्ञानी सामान्य माणसांची होणारी फसवणूक, पिळवणूक देव धर्माचा वापर करून धनदांडगे होणारे ठराविक लोक यावर दादांनी बोट ठेवले आहे. या स्वार्थी ढोंगी लबाड दुनियेत खरे बोलणाऱ्याला कायम त्रास सहन करावा लागतो हे दाहक वास्तव दादांनी मांडले आहे. मुलाबाळांसाठी पैसा धन संपत्ती मिळवूनही हीच मुलेबाळे वार्धक्यात मातापित्यांची हेळसांड करतात हे सत्य दादा आपल्या गीतातून मांडतात.

मला घेऊन चला या चित्रपटातील जोडी बैलाची खिल्लारी हे गीत शेतीप्रधान, ग्रामीण संस्कृतीत बैलांचे महत्त्व सांगणारे गीत आहे. पशुधनास शेतकरी विठ्ठल रुक्मिणी एवढे पवित्र आदरणीय, पूजनीय माणतात असे दादा या गीतातून सांगतात.

कोणतीच व्यक्ती सर्वगुणसंपन्न नसते किंवा पूर्णपणे बरोबर व पूर्णपणे चुकीची नसते या नियमाला दादाही अपवाद नाहीत. दादांनी मराठी चित्रपट सृष्टीत केलेली उल्लेखनीय कामगिरी, मराठी चित्रपट सृष्टीला दिलेले योगदान, मराठी माणसाला  काही काळ का होईना दुःख विसरायला लावून, आपल्या विनोदाद्वारे खळखळून हसायला लावून त्यांच्या जीवनात भरलेले आनंदाचे क्षण या गोष्टी आपण लक्षात ठेवायला हव्यात. दादा कोंडके म्हटले की द्विअर्थी चित्रपट शीर्षक, द्विअर्थी गीते, द्विअर्थी संवाद हा चष्मा काढला तरच दादा मधील भोळाभाबडा, प्रामाणिक, सच्चा दिलदार माणूस आपल्या दृष्टीस पडेल.

## संदर्भ

*चिटणीस, लि.(1990). चंदेरी दुनियेत. श्री विद्या प्रकाशन, पुणे.*
*परांजपे, अ. (1999). सोंगाड्या. सुरुची प्रकाशन.*
*पाध्ये, अ. (2022). एकटा जीव. मंजुल प्रकाशन, पुणे.*
*झनकर, अ. (1995). सिनेमाची गोष्ट. राजहंस प्रकाशन,* पुणे.
नगरकर, रा. (2001). रामनगरी. मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*